MHBH040004872026

**फौ.कि.अर्ज क्र.६४/२०२६ मधील निशाणी क्रमांक १ वरील आदेश**

(रोहित –वि– महाराष्ट्र सरकार)

(पो.स्टे.पालांदूर गु.र.क्र.१११/२०२६, भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३०५(e), मो.वा.का. चे कलम ५०(१) प्रमाणे)

**१.** अर्जदार यांचे कथन असे की, अर्जदार यांच्या मालकीचे एक ट्रॅक्टर क्रमांक MH-34/BR-6332 एक विना क्रमांकाची लाल रंगाची ट्रॉली हे वाहने पालांदूर पोलीस स्टेशन गु.र.क्र.१११/२०२६ कामी जप्त केलेले असून ते परत मिळावे म्हणून अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराने अर्जात पुढे असे कथन केले आहे की, वर नमुद ट्रॅक्टर यांच्या मालकीचा असून त्याच्या नावे नोंदणीकृत असून ट्रॉली ही त्याने माऊली वेल्डींग वर्क शॉप, पालांदूर, ता.लाखनी जि.भंडारा येथून दिनांक १२/०४/२०२६ रोजी विकत घेतली आहे. वर नमुद वाहनांच्या संबंधाने संपूर्ण तपास पूर्ण झालेला आहे. सदर वाहन हे त्यांच्या ताब्यात न मिळाल्यास ते पोलीस स्टेशन, पालांदूर येथे एका जागेत पडून राहिल्यास त्यांच्यात तांत्रिक बिघाड होऊन अर्जदाराचे नुकसान होईल. अर्जदार हे न्यायालयाने दिलेल्या शर्ती व अटींचे पालन करण्यास तयार आहेत. शेवटी त्यांनी सदरचा अर्ज आपल्या मागणीप्रमाणे मंजूर करण्याची विनंती केली.

**२.** सदर अर्ज दाखल झाल्यानंतर तपासीक अंमलदार व सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा खुलासा मागविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी (नि.क्र.५) प्रमाणे

तर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.१ च्या पाठीमागे आपले म्हणणे सादर केलेले आहे. तपासीक अंमलदार यांनी आपले म्हणणे सोबत या गुन्ह्यातील जप्ती पंचनाम्याची सत्यप्रत दाखल केली आहे.

३. तपासीक अंमलदार यांनी त्यांच्या खुलाशात असे नमुद केले की, गुन्ह्याचा तपास सुरु असून गुन्ह्यातील वाहने हे अवैधरित्या रेती चोरी करून त्याची वाहतूक करीत असतांना मिळून आले आहेत. सदर ट्रॅक्टर व ट्रॉली याचेवर अद्यापपर्यंत मा. तहसिलदार व मा. उप.प्रादेशीक परिवहन कार्यालय, भंडारा यांचेकडून कार्यवाही होणे बाकी आहे. जर अर्जदारास सदर वाहने परत केल्यास तो अश्याच प्रकारचा गुन्हा करण्याची दाट शक्यता आहे असे नमुद करून त्यांनी वर नमुद वाहने परत देण्यास हरकत घेतली आहे. सरकारी अभियोक्ता यांनी आपल्या खुल्याश्यात तपासीक अंमलदार यांनी दिलेल्या खुलाश्याप्रमाणे नमुद केले असून सदर ट्रॅक्टर व ट्रॉली ही अर्जदार याचेकडून जप्त करण्यात आली आहे. सदर ट्रॅक्टर व ट्रॉली याचेवर अद्यापपर्यंत मा. तहसिलदार व मा. उप.प्रादेशीक परिवहन कार्यालय, भंडारा यांचेकडून कार्यवाही होणे बाकी आहे. तसेच सदर ट्रॅक्टर व ट्रॉली परत दिल्यास पून्हा अशा प्रकारचा गुन्हा करण्याची तसेच वाहन विक्री करण्याची दाट शक्यता आहे. सबब, सदर अर्ज नामंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. आपल्या कथनाच्या समर्थनार्थ अर्जदाराने (नि.क्र.३) सोबत

गु.र.क्र.१११/२०२६ ची छायांकित प्रत, ट्रॅक्टरच्या नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकित प्रत, ट्रॉली माऊली वेल्डींग वर्क शॉप, पालांदूर येथून विकत घेतल्याबाबत दिनांक १२/०४/२०२६ रोजीच्या बिलाची पडताळणी केलेली प्रत व त्याच्या आधारकार्डची पडताळणी केलेली प्रत अशी कागदपत्रे अभिलेखावर सादर केलेली आहेत. अर्जदाराचे विधीज्ञ श्री. जे.डी.धोटे व सरकारी अभियोक्ता श्री.एन.पी. लडकत यांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** अभिलेख तसेच युक्तीवादाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम ४८(७)(८) चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर तरतुदींनुसार गौण खनिजाचे अवैधपणे उत्खनन, वाहतुक इ. कृत्य करणा–या व्यक्ती तथा त्या वाहनांबाबत कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार महसुल अधिकारी यांना आहे. याच कलमांमध्ये संबंधीतावर दंड, जप्ती इ. कार्यवाहीचा देखील उल्लेख आहे. त्यामुळे सदर कलमान्वये योग्य ती कार्यवाही ही महसुल विभागामार्फत करता येऊ शकते. अभिलेखाच्या अनुषंगाने **महाराष्ट्र सरकार मार्फत तहसिलदार, मोहाडी विरूध्द पंकज व इतर** (क्रि.रिट.पिटीशन क्र. २१९/२०२२ दिनांक २०/०४/२०२२) माननीय बॉम्बे उच्च न्यायालय, खंडपिठ नागपूर या न्यायनिवाड्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत न्यायनिवाड्यातील परिच्छेद क्र.९ व १० मध्ये मा. नामदार उच्च न्यायलय यांनी असे निष्कर्ष नोंदविले की,

| | |
|---|---|
| Para No.9 | “It would be a different situation altogether, if the vehicle is |

seized by the Police, upon an offence being registered under the Indian Penal Code or any other provisions of law, under which the Police is empowered to take action as per the relevant statute in this regard, for which the language of Section 457(1) of Cr.P.C. is clear and specific and empowers the Magistrate to assume jurisdiction whenever the seizure of any property by any Police Officer is reported to him under the provisions of the Cr.P.C. and such Property is not produced before the criminal Court during an inquiry or trial, and it is only upon such reporting and non-production that the Magistrate would be empowered to pass appropriate orders in respect of the property seized and not otherwise."

Para No.10 "As the seizure is by the Tahsildar under the provisions of Section 48(8)(1) of the MLR code and a specific provision has been made in Section 48(8)(2), empowering the Collector or any Officer not below the rank of Deputy Collector as authorized by him to entertain an application for release of the vehicle, it is only the Collector or the Deputy Collector as authorized by him, who would by empowered to entertain an application for release of the vehicle upon such terms, as are specified in Section 48(8)(2) of the MLR Code and not otherwise, for the reason that a special provision has been enacted by the State legislature, in respect of illegal transportation of sand and other minerals, by virtue of Section 48 of the MLR Code as amended from time to time in this regard".

६. वर नमुद न्यायनिवाड्यामधील मार्गदर्शक तत्वानुसार अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा गुन्हा हा आरोपीविरुध्द ३०५(e), ६२, ३(५)भा.न्या.संहिता अन्वये दाखल करण्यात आला असून पोलीसांनी सदरची दोन्ही वाहने जप्त केलेली आहेत. सदरची बाब तपासीक अंमलदार यांनी दाखल केलेल्या जप्ती पंचनाम्यावरून प्रथमदर्शनी दिसून येते. सदरची वाहने महसुल विभागातर्फे जप्त करण्यात आल्याचे देखील दिसून येत नाही. त्यामुळे **महाराष्ट्र सरकार (वर नमुद केल्याप्रमाणे)** मधील परिच्छेद क्र.९ मधील निष्कर्ष वरुन सदरच्या वाहनांचा अंतरिम ताबा मागणी करीता दाखल करण्यात आलेला प्रस्तुत अर्ज कलम ५०३ भा.ना.सु.स., २०२३ मधील प्राप्त अधिकारानुसार या न्यायालयास विचारात घेता येईल. सबब, मी सहाय्यक सरकारी अभियोक्ता व तपासी अंमलदार यांच्या कथनाशी सहमत नाही.

७. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, जप्त मुद्देमाल ट्रॅक्टर व ट्रॉली हे अर्जदाराच्या मालकी व ताब्यात असल्याचे अभिलेखावर आले आहे. ते यापूर्वी कोणत्याही गुन्हयात जप्त केले नसून ते जप्ती पासून सदरची वाहने पोलीस स्टेशन पालांदूर, तह. लाखनी, जि. भंडारा येथे आहे. सदरचे वाहने पोलीसांच्या ताब्यात ठेवणे संयुक्तिक नाही. मा. नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सुदंरभाई अंबालाल देसाई आणि सि. एम.मुदालिअर विरुध्द गुजरात सरकार** (ए.आय.आर २००२ सुप्रीम कोर्ट ६३८) या न्यायानिवाड्यामध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार जप्त मुद्देमाल हे पोलीस स्टेशन, पालांदूर,

तह.लाखनी, जि. भंडारा यांच्या ताब्यात न ठेवता लवकरात लवकर त्याचा ताबा योग्य त्या व्यक्तीस देणे उचित राहील. या गुन्ह्यातील संपरीक्षा होऊन गुणदोषावर त्याचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे सदरचे वाहने पोलीस स्टेशन, पालांदूर, तह. लाखनी, जि. भंडारा यांचे कार्यालयाचे परिसरामध्ये ठेवणे योग्य राहणार नाही.

८. या ठिकाणी भा.ना.सु.स. चे कलम ४९७ चा उहापोह केला असता असे दिसून येते की, न्यायादंडाधिकारी यांच्या समक्ष हजर करण्यात आलेल्या जप्त मुद्देमाल मिळकतीचे कलम ४९७ (२) नुसार सविस्तर वर्णन नमुद करून शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे त्याचे तपशील (statement) तयार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे उपकलम (३) नुसार सदर मिळकतीचे छायाचीत्र अथवा आवश्यकता भासल्यास छायाचीत्रण मोबाईल फोन किंवा इतर साहित्याच्या माध्यमातून करून घेण्याबाबत न्यायदंडाधिका–यांनी आदेशीत करावे. त्याचप्रमाणे सदरचे वाहने या न्यायालयासमक्ष हजर देखील करण्यात आले नाही. त्यामुळे या टप्प्यावर जप्त मुद्देमाल बाबत सदरचा तपशील (statement) तयार करण्यात आले नाही. असे जरी असले तरी सदर जप्त मुद्देमाल वाहनांचे छायाचीत्र काढून वाहनांचे छायाचीत्रण करण्याबाबत निर्देश देणे योग्य राहिल.

९. सबब, वरील विवेचनाअंती मी या निष्कर्षाप्रती येऊन पोहोचलो की, सदरच्या वाहनांचा अंतरिम ताबा कलम ५०३ (१) भा.ना.सु.स., २०२३ अन्वये प्राप्त

अधिकारानुसार योग्य त्या अटी व शर्ती लादून अर्जदाराच्या ताब्यात देणे योग्य असल्याचे या क्षणी दिसून येते. सदरचे वाहनांचा ताबा अर्जदाराला देतांना त्यांच्याकडून वाहनांचे रितसर कागदपत्रे तपासिक अंमलदार यांच्या कडे सादर करणे बाबत आदेश करणे योग्य राहील. त्याचप्रमाणे अर्जदाराने वर नमुद ट्रॉलीची नोंदणी उपप्रादेशिक परीवहन कार्यालयात आपल्या नावे करून घेतल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे सदरची नोंदणी करून घेण्याबाबत निर्देश देणे उचित राहील. त्याचप्रमाणे जर ट्रॉली मध्ये वाळू आढळल्यास तपासीक अंमलदार यांनी त्याचा रितसर पंचनामा करून सदरची वाळू आपल्या ताब्यात घ्यावी असे निर्देश देणे उचित राहिल. तसेच सदर मुद्देमाल अर्जदारास परत करतेवेळी हमी घेणे अनिर्वाय आहे. सबब, प्रस्तुत खटल्यातील नमूद मुद्देमाल हमी घेवून अर्जदाराला तात्पुरते परत करणे न्यायोचित आहे. परिणामी मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. पोलीस स्टेशन, पालांदूर यांचे गु.र.क्र.१११/२०२६ मध्ये जप्त केलेला मुद्देमाल एक ट्रॅक्टर क्रमांक MH-34/BR-6332 एक विना क्रमांकाची लाल रंगाची ट्रॉली चा ताबा अर्जदार रोहित किशोर भुसारी राहणार पालांदूर, ता. लाखनी जि. भंडारा यांचेकडे खालील अटी व शर्तीवर सुपुर्द करण्यात येते.

३. तपासीक अंमलदार, पोलीस ठाणे पालांदूर यांना असे निर्देशित करण्यात येते की, कागदपत्रांची पडताळणी करुन वर उल्लेखित मुद्देमाल ट्रॅक्टर व ट्रॉली हे वाहने अर्जदाराला सुपूर्द करण्यात यावे. तसेच त्यांनी मुद्देमाल सुपूर्द करण्यापुर्वी सदर

वाहनांचे सर्व बाजूने छायाचित्र काढून घेवून मोबाईल फोनद्वारे सर्व बाजूने चीत्रीकरण करून घ्यावे. अर्जदार यांनी सदरच्या छायाचित्रांच्या सत्यतेबाबत त्यांच्या पाठीमागे आपली स्वाक्षरी करावी. सदर कार्यवाहीचा खर्च अर्जदाराने करावा. जप्त ट्रॉली मध्ये वाळू आढळल्यास त्याचा रितसर पंचनामा करून सदरची वाळू तपासीक अंमलदार यांनी आपल्या ताब्यात घ्यावी.

४. अर्जदाराने वर नमूद मुद्देमाल ट्रॅक्टर च्या हमी पोटी रुपये १०,००,०००/- (दहा लाख रुपये) तर वर नमुद ट्रॉली च्या हमी पोटी रुपये २,००,०००/- (दोन लाख रुपये) चे सुपूर्दनामा/बंधपत्र देवून हमी दयावी की, ज्यावेळी न्यायालय सदरची रक्कम भरण्याबाबत/जमा करण्याबाबत आदेशीत करेल त्यावेळी अर्जदार हे सदरची रक्कम न्यायालयात भरणा/जमा करतील.

५. अर्जदारानी मुद्देमालाच्या स्वरुपात बदल करु नये, अभिहस्तांतरण करु नये, खटल्याच्या कामी जेव्हा केव्हा गरज पडेल तेव्हा सदरचे वाहने न्यायालयात हजर ठेवण्याची तजवीज ठेवावी. त्याचप्रमाणे तपासीक अंमलदार यांनी लेखीमध्ये कळविल्यास त्यांच्या समोर सदरचे वाहने हजर करावे.

६. अर्जदारानी वर नमूद मुद्देमाल ट्रॅक्टर व ट्रॉली बाबतच्या कागदपत्रांची प्रत तपासीक अधिकारी, पोलीस ठाणे, पालांदूर यांना उपलब्ध करुन द्यावी.

७. अर्जदाराने या आदेशापासुन तिस दिवसाच्या आत वर नमुद ट्रॉली ह्याची रितसर नोंदणी आपल्या नावे उपप्रादेशिक परीवहन कार्यालयात करून घ्यावी आणि त्याबाबतच्या कागदपत्राची स्वसाक्षांकीत प्रत तपासी अधिकारी यांना सुपुर्त करावी व तपासी अधिकारी यांनी सदर ट्रॉलीची रितसर नोंदणी झाल्यानंतरच अर्जदाराच्या ताब्यात ती द्यावी.

८. अर्जदार व त्यांच्या वतीने इतर कोणीही वर नमुद वाहनांचा उपयोग भविष्यात कोणत्याही गुन्ह्याकामी करू नये. तसेच सदर ट्रॉलीवर सर्व बाजुने ठळकपणे नोंदणीक्रमांक टाकावा.

९. सध्याचा आदेश हा, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ४८ आणि खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम (Mines and Minerals Act) यांच्या तरतुदीनुसार अर्जदार किंवा आरोपीविरुद्ध कारवाई करण्याचे तहसीलदार, लाखनी यांच्या अधिकारांवर प्रतिकूल परिणाम करणारा (बाधक) असणार नाही.

१०. तपासीक अंमलदार, पोलीस ठाणे, पालांदूर यांनी सदरचा सुपूर्दनामा/बंधपत्र व इतर कागदपत्र या गुन्ह्यातील दोषारोप पत्रासोबत दाखल करावा.

UDAY PRAKASH HINGMIRE

Digitally signed by UDAY PRAKASH HINGMIRE
Date: 2026.06.23 16:53:04 +0530

(यु.पी.हिंगमिरे)

दिनांकः– २३/०६/२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,

**लाखनी**

**::Certificate::**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.R. Gate |
| Court Name | : | J.M.F.C. Court, Lakhani |
| Date | : | 23/06/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 23/06/2026 |
| Judgment uploaded on | : | 23/06/2026 |